महाराष्ट्र शासन, गृह विभाग,
विशेष पोलीस महानिरीक्षक, नाशिक परिक्षेत्र, नाशिक कार्यालय
"दक्षता" बिल्डींग, जुना आग्रा रोड, गडकरी चौक, नाशिक 422001

Office Ph / Fax no. 0253-2970711 EmailID, ig.nashikrange@mahapolice.gov.in

जा.क्र. विपोमनि/नाप/आस्था-2/उच्च व निम्न श्रेणी लघु-सर्व बदल्या-2025/2025 771 दिनांक /05/2025 8 MAY 2025

संदर्भ :-1. महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्य पार पाडतांना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम-2005.

2. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्ण क्र. एसआरव्ही-2017/प्र.क्र.415/कार्यासन-12, दि.09.04.2018.

विषय :- जिल्हा लिपीक संवर्गातील उच्च व निम्न लघुलेखक व लघुटंकलेखक सर्वसाधारण बदल्या- 2025

---00---

जिल्हा लिपीक संवर्गातील एकाच कार्यालयात सलग 03 वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त कालावधीची सेवा पुर्ण करणाऱ्या उच्च श्रेणी व निम्न श्रेणी लघुलेखक, यांच्या सर्वसाधारण बदल्या 2024 मध्ये बदल्या करण्याकरिता सध्याच्या कार्यालयात व सध्याच्या पदावर दिनांक 31/05/2025 रोजी 03 वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त काळ सेवापूर्ण केलेल्या व सध्याच्या पदावर दिनांक 31/05/2025 रोजी 06 वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त काळ सेवा पुर्ण केलेल्या लघुटंकलेखकांची माहिती संदर्भ क्रमांक 2 मधील शासन निर्णयातील तरतूदीनुसार परिपूर्ण व बिनचुक माहिती सोबतच्या विवरणपत्रात भरुन दिनांक 15/05/2025 पर्यंत या कार्यालयास न चुकता ISM मराठी फॉन्ट DVBW-TT-SUREKH यामध्ये तयार करुन स्वतंत्र पेनडॉईव्हमध्ये सादर करावी.

(1) बदलीपात्र कर्मचाऱ्यांनी त्यांच्या पसंतीच्या ठिकाणी पदस्थापना मिळावी यासाठी कमाल 05 ठिकाणांचा पसंतीक्रम सादर करावा (कर्मचाऱ्यांनी पसंतीक्रम न दिल्यास प्रशासनाच्या सोईनुसार त्यांची बदलीने पदस्थापना करण्यांत येईल.) तसेच पसंतीक्रमामध्ये 01 विकल्प अवघड क्षेत्रातील नमुद करण्यात यावा.

(2) बदलीपात्र कर्मचारी सध्या अवघडक्षेत्रात / बिगर अवघड क्षेत्रात कार्यरत आहेत याबाबतची माहिती सादर करावी.

(3) बदलीपात्र कर्मचारी हे त्यांचे एकूण शासकीय सेवा कालावधीमध्ये यापूर्वी कोणकोणत्या ठिकाणी कार्यरत होते याबाबतचा सविस्तर तपशिल सादर करावा.

(5) बदलीपात्र कर्मचारी हे शासन निर्णयासोबत जोडलेल्या विवरणपत्र-2 मध्ये नमुद केलेल्या प्राधान्य क्रमांक 1 ते 5 पैकी ते कोणत्या प्राधान्यक्रमात मोडतात याबाबतची माहिती पुराव्यासह सादर करावी.

2. ज्या लघुलेखकांची सध्याच्या कार्यालयात नियत कालावधीपेक्षा कमी सेवा झाली आहे परंतु विनंतीवरुन त्यांना परिक्षेत्रांतर्गत इतरत्र बदली पाहिजे आहे, अशा लिपीकांची माहिती सादर करतांना महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक एसआरव्ही-2014/मु.स-34/प्र.क्र.379/12 दिनांक 11/02/2015 मध्ये दिलेल्या सुचनांचे अनुषंगाने, तीन वर्षाचा कालावधी पूर्ण लघुलेखकांची पसंतीच्या ठिकाणी बदली करण्याची विनंती केल्यास संबंधित घटक प्रमुखांनी सदर लघुलेखकांच्या अर्जामधील कारण खरे आहे किंवा कसे ? याबाबतची खात्री करावी.

कृपया मागे पहावे

अर्जदाराने सादर केलेल्या पुराव्यानुसार घटक प्रमुखांची खात्री पटल्यानंतरच त्यांच्या अर्जातील विशिष्ट कारण अभिप्रायामध्ये स्पष्ट नमुद करुन त्यांचे बंदलीसंदर्भात स्वंयस्पष्ट शिफारस करुन त्यांचे बदलीचे अर्ज या कार्यालयास सादर करावेत.

३. बदलीकरिता दर्शविलेल्या पसंतीच्या ठिकाणी पद रिक्त नसल्यास किंवा प्रशासकीय कारणास्तव बदली करता येत नसल्यास त्याची इतरत्र देखील बदली केली जाऊ शकते. याबाबत संबंधित सर्व लघुलेखकांना अवगत करावे.

4. संदर्भ क्रमांक 2 मधील शासन निर्णयान्वये नमुद केल्याप्रमाणे शासकीय किंवा विनंती बदली करतांना कर्मचाऱ्यांने यापूर्वी ज्या ठिकाणी सेवा केली आहे त्या मुळ जागेवर बदली करण्यात येणार नाही.

5. प्रत्येक लघुलेखक यांचेकरिता स्वतंत्र विवरणपत्र तयार करावे. माहिती सादर करतांना कोणत्याही रकान्यात रेघ / डॅश (-) नमुद करु नये. तारखांबाबतची माहिती पूर्ण भरतांना पुर्ण तारीख नमुद करावी. केवळ माहिना व वर्ष नमुद करु नये. विवरणपत्रामध्ये चुकीची माहिती भरल्यास किंवा उशिराने पाठविल्यास याबाबत संबंधितांना जबाबदार धरण्यात येईल, याबाबत नोंद घ्यावी. त्याचप्रमाणे माहिती "निरंक" असल्यास तसेही या कार्यालयास न चुकता कळविण्यात यावे.

उपरोक्त शासन निर्णयात नमुद परिशिष्ट-१ मधिल विवरणपत्र-१ मध्ये नमुद केल्या प्रमाणे विवरणपत्रात स्वतंत्रपणे माहिती सादर करावी. सदरच्या बदलीपात्र कर्मचाऱ्या व्यतिरिक्त ज्या लघुलेखक संवर्गातील दिनांक ३१/०५/२०२५ रोजी ३ वर्षाचे एक सेवा कालावधी पुर्ण होणार आहे. त्यांची माहिती सादर करावी तसेच घटक प्रमुखांनी आपल्या आस्थापनेवरील लघुलेखक संवर्गातील हजर, मंजुर रिक्त पदांची माहिती या कार्यालयास तात्काळ सादर करावी.

त्याचप्रमाणे खालील नमुद केलेल्या ज्या घटक कार्यालयांमध्ये लघुलेखकांनी बदलीसाठी अर्ज सादर केले असतील किंवा नसतील त्याबाबतही निरंक अहवाल सादर करण्यात यावा.

सोबत:- विवरणपत्र-02

(दत्तात्रय कराळे)
विशेष पोलीस महानिरीक्षक,
नाशिक परिक्षेत्र, नाशिक.

प्रति,

पोलीस आयुक्त, नाशिक शहर (सस्नेह अग्रेषित)
पोलीस अधीक्षक, नाशिक ग्रामीण / अहिल्यानगर / जळगांव / धुळे / नंदुरबार
प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र, धुळे.
समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट क्रमांक 6, धुळे.
समादेशक तथा नियंत्रण अधिकारी, राज्य आपत्ती प्रतिसाद दल, धुळे
पोलीस उपअधिक्षक, बिनतारी संदेश विभाग, नाशिक

## सार्वत्रिक बदल्या सन 2025 साठी आवश्यक असलेली उच्च व निम्न श्रेणी लघुलेखक व लघुटंकलेखक माहिती

### प्रशासकीय बदल्यासाठी विवरणपत्र

| अ.क्र. | पूर्ण नाव | सध्याच्या नेमणुकीचे कार्यालय व नेमणुक दिनांक व एकुण कालावधी (31/05/2025 रोजी पुर्ण झालेली एकुण सेवा (वर्षे, महिना व दिवस | स्वग्राम जन्म दिनांक सेवानिवृत्ती दिनांक | शासन सेवेत नियुक्ती झाल्यापासुन आतापर्यंत केलेल्या सेवेचा तपशील (कार्यालयाचे नाव व पुर्ण तारखेसह | वि.चौ. चालु असल्यास त्याबाबतची सध्यस्थिती | बदलीकरिता पसंतीचे आठ ठिकाणे | शासन निर्णय एसआरव्ही-2017/प्र.क्र.415/ दि 09/04/2018 अन्वये प्राधान्यक्रम | घटक प्रमुखांचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| I | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| | संपूर्ण नाव नमुद करावे. | | | | | | | प्रशासकीय बदलीसाठी काही आवश्यक अभिप्राय असल्यास ते नमुद करावेत. |

प्रमाणित करण्यात येते की, वर नमुद केलेली माहिती अभिलेखानुसार पडताळुन पाहिली असुन ती बरोबर आहे.

घटक प्रमुखांची स्वाक्षरी

टिप प्रत्येक लघुलेखकांसाठी स्वतंत्र विवरणपत्र तयार करावे.